Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ४४] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर २७-डिसेंबर ३, २०२५/अग्रहायण ६-१२, शके १९४७ [पृष्ठे १०, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३४०.

संचालक, नगर रचना, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.

आदेश

क्रमांक-डि.टी.पी.-वि.यो. काटोल (सु. + वा.क्षे.)-कलम १२७(२)-आदेश-टिपीव्ही-२-५९४४.—

ज्याअर्थी, काटोल नगर परिषदेची (सु. + वा. क्षे.) विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे 'उक्त अधिनियम' असे संबोधिलेले आहे) चे कलम ३१ (१) चे तरंतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२४०६-दिनांक ३१२३-दिनांक प्र.क्र.-१३३(A)-०७-नवि-९, दिनांक ०४ नोव्हेंबर, २००८ अन्वये (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिलेले आहे.) भागशः मंजूर केली असून ती दिनांक १५ डिसेंबर, २००८ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिलेली आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौजा काटोल येथील सर्व्हे नं. २९४ या जमिनीचे भागशः क्षेत्र आरक्षण क्रमांक ९९, "दुकान केंद्र" या आरक्षणाने व १२ मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधित होत आहे (यापुढे "उक्त आरक्षण व रस्ता" असे संबोधिलेले आहे) उक्त आरक्षणाच्या भुसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, काटोल आहे (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षण व ररत्याखालील व जमिनी संपादन केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा काटोल येथील सर्व्हे नं. २९४ या जमिनीमधील उक्त आरक्षणाने व रस्त्याने बाधित क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमिन" असे संबोधिलेले आहे) संबंधित जमीन मालक यांनी (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिलेले आहे) उक्त अधिनियमाचे कलम- १२७(१) वे तरतुदीनुसार उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक ०८ जुलै, २०२० रोजी सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिलेले आहे) बजाविलेली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनमालकंनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमिन संपादित केलेल्या नाही अथवा उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केली नाही;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठाकडील रिट याचिका क्र. ४००४/२०२२ मध्ये (यापुढे "उक्त रिट याचिका" असे संबोधिलेले आहे.) दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या आदेशात उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याबाबत आदेश पारीत केले आहेत;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी काटोल, नगर परिषद यांनी, पत्र क्र. नपका/नरवि/१५५४/२०२५, दिनांक २१ ऑगष्ट, २०२५ अन्वये प्रकरणी नगर रचना संचालनालयास प्रस्ताव सादर केला असुन त्यामध्ये, "नगर परिषदेची आर्थीक परिस्थिती बरोबर नसल्याने जागा खरेदी करू शकत नसल्याने सर्वे नंबर २९४ मधील आरक्षण क्रमांक ९९ "शॉपींग कॉम्प्लेक्स" व १२ मी. डी. पी. रोड" जागेतील १२ मीटर रूंद डी. पी. रोडची जागा वगळून उर्वरित आरक्षणाची जागा व्यपगत झाल्यास स्थानिक प्राधिकरण म्हणुन नगर परिषदेची काहीही हरकत नाही. असा ठराव पारित केलेला असून, तसा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. असे नमुद केले आहे;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय नागपूर यांनी पत्र क्र. कलग-१२७/वि.यो. काटोल/मौजे-काटोल/स.क्र २९४/२२५७, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ अन्वये प्रकरणी नगर रचना संचालनालयास प्रस्ताव सादर केला असुन त्यामध्ये, "या कार्यालयाचे उपलब्ध अभिलेखानुसार रिट याचिका क्र. ४००४/२०२२ मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे संबंधित रिट याचिका क्र. ४००४/२०२२ मध्ये दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ पारित आदेशास २४ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असुन सदर आदेशाविरुद्ध शासनाद्वारे पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात आलेली नाही. सबब, उक्त आदेशानुसार सर्व्हे क्र. २९४ मधील प्रस्तावित १२.० मी. रुंद विकास योजना रस्ताचे आरक्षण वगळणे जरी नियोजनाच्या दृष्टीने संयुक्तीक नसले तरी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात विशिष्टपणे नमुद केल्याप्रमाणे सर्व्हे क्र. २९४ मधील आरक्षण क्रमांक ९९ "दुकान संकुल" (Shopping Center) चे आरक्षण व १२.० मी. रुंद विकास योजना रस्ता व्यपगत झालेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ (२) अंतर्गत अधिसूचना निर्गमीत करणे योग्य होईल" असे नमुद केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीपैकीच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षण व रस्ताबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार उक्त जमिनीपैकीच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षण व रस्ता व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.टिपीएस-१८१३/३२११ प्र.क्र.५०८/नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा/नगर पंचायती/जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम-१२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीपैकी सर्व्हे नं २९४ या जमिनीपैकीच्या क्षेत्रावरील उक्त आरक्षण व रस्ता व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेः-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

परिशिष्ट

अ.क्र.	नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा	उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र	उक्त जमिनीचा तपशील	उक्त आरक्षणातून व्यपगत झाले अंदाजे क्षेत्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
				(चौ.मी.)
१.	काटोल नगर परिषद, मौजा काटोल, ता. काटोल, जि. नागपूर	आरक्षण क्र. ९९ "दुकान केंद्र" अंदाजे क्षेत्र ०.५२५ हे. आर	सर्व्हे क्र. २९४	५५८३.२०
		१२ मी. विकास योजना रस्ता	सर्व्हे क्र. २९४	बाधित क्षेत्र

टीपः- १. उक्त आरक्षणातून व रस्त्यामधुन मुक्त झालेल्या उक्त जमिनीच्या लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाया विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

२. सदरचा आदेश अर्जदार यांनी पुरविलेल्या दिनांक ०२ डिसेंबर, २०१६ रोजीच्या पोटहिस्स्याच्या हद्दी निश्चितीसाठीच्या मोजणी नकाशाच्या छायाप्रतीच्या अधीन राहून पारीत करण्यात येत आहे. अर्जदार यांनी त्यांचे सुचनेंतर्गत जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने, रादर आदेशामध्ये नमूद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्भवल्यास त्यास अर्जदार स्वतः जबाबदार राहतील.

३. उक्त रस्त्यामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीच्या भागशः क्षेत्रामुळे उक्त रस्त्याची संलग्नता खंडित होत आहे. त्यामुळे दळणवळणाच्या व संलग्नतेच्या दृष्टीकोनातून उक्त मंजूर सुधारित विकास योजनेत प्रस्तावित केलेले उक्त जमिनीमधील क्षेत्र हे रस्त्यासाठी कायम ठेवणे आवश्यक आहे. या दृष्टीने मुख्याधिकारी, नगर परिषद, काटोल यांनी नियोजन प्राधिकरण म्हणून कायद्याच्या चौकटीत उक्त जमीन मालकास अन्य पर्याय देवू करुन त्यांचे सहमतीने योग्य ती कार्यवाही करावी.

४. उक्त आरक्षणातून व रस्त्यामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, काटोल, जि.नागपूर यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

५. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

जितेंद्र ल. भोपळे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३४१.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

ORDER

No. D.T.P.-D.P.-Katol(R+AA)-Sec-127(2)-Order-TPV-11-5944.–

Whereas, the Development Plan of Katol Municipal Council (Revised +AA) has been partly sanctioned as per the provisions of section 31 *(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government. in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2406-3123-CR-133(A)-07--~UD-9, dated 04th October, 2008 (hereinafter referred to as "the said Notification") & has come into force with effect from dated 15th December, 2008, (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Development Plan, part area of the land bearing S.No 294 of Mouza Katol is affected by the Reservation Site No. 99 "Shopping Complex" and 12 m.wide Development Plan Road (hereinafter referred to as "the said Reservation and Road ") and the Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation and Road is Municipal Council, Katol (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the aforesaid land affected by the said Reservation and Road have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan come into force;

And whereas, the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") of the lands bearing S.No. 294 which are affected by the said Reservation and Road (hereinafter referred to as "the said Land") had served a notice dated 08th July, 2020 as per the provisions of section 127*(1)* of the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority;

And whereas, the said Land under the said Reservation and Road is not acquired or no steps as required as per the provisions of section 127 (*1*) of the said Act has been taken by the Appropriate Authority within the stipulated period from the date of service of the said notice by the said Land Owner as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas, the Hon'ble High Court, Mumbai, Nagpur Bench in the order dated 26th September 2022 in Writ Petition No. 4004/2022 (hereinafter referred to as "the said Writ Petition") has passed an order that, the said Reservation and Road on the said Land have been lapsed as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas, Chief Officer, Municipal Council, Katol *vide* Marathi letter No. नपका-नरवि-१५५४-२०२५, दिनांक २१ ऑगस्ट,२०२५ has submitted a proposal to the Directorate of Town Planning regarding the lapsing of the said Reservation and Road, stating that, "Since the financial condition of the Municipal Council is not sound and the land cannot be aquire by, the Municipal Council, as a local authority, has no objection if the remaining reservation land, excluding the 12- meter-wide D.P. Road in the reservation number 99 "Shopping Complex and 12 m. D.P. Road" in Survey No. 294, is vacated. Such a resolution has been passed and such a proposal has been submitted to the government";

And whereas, Assistant Director,Town planning, Nagpur Branch Office, Nagpur *vide* Marathi letter No कलम-१२७ - वि. यो. काटोल-मौजे-काटोल-रा. क्र २९४ -२२५७, दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ has submitted a proposal to the Directorate of Town Planning regarding the lapsing of the said Reservation and Road, stating that, "In this case, as per the records available in this office. Writ Petition No. 4004/2022 Hon'ble High Court, Nagpur Bench, the period of time has been more than 24 months since the order passed in the relevant Writ Petition No. 4004/2022 dated 26th September, 2022 and no review petition has been filed by the Government against the said order. Therefore as per the said order, although the reservation of the proposed 12.0 m. wide development plan road in Survey No. 294 is not joint in

terms of planning, as specifically mentioned in the order given by the Hon'ble High Court, it would be appropriate to issue a notification under Section 127 (*2*) of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 regarding the lapse of reservation number 99 "Shopping Center" and 12.0m. wide development plan road in Survey No. 294";

And whereas, in view of the above facts regarding the said Reservation and Road on the area of said land the Director Town Planning Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue an order regarding the lapsing ther said Rervation and Road on the area of the said land;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No.TPS-1813-3211-CR- 508-UD-13, dated 01st December, 2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 (*2*) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the land bearing S.No. 294 as per the provisions of section 127(2) of the said Act & for that purpose amend the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added:–

SCHEDULE

Sr. No.	Municipal Council, Mouza, Taluka and District	Proposal in the said Sanctioned Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report	Description of the said Lands	Approximate Area lapsed form the said Reservation
(1)	(2)	(3)	(4)	(5)
				(sq. mt.)
1	Katol Municipal Council, Mouza Katol Tal. Katol, Dist. Nagpur.	Site No. 99, "Shopping Complex" Area 2.76 Ha.	S. No. 294	5583.20
		12 m. D.P. Road	S. No. 294	Affected Land

Note:- 1. The said Land so released from the said Reservation and Road shall become available to the said Land Owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent lands under the said sanctioned Development Plan.

2. The said order is being issued subject to the photocopy of demarcation maps dated 02nd December,2016 submitted by the noticee. As the noticee have not submitted the updated and certified demarcation map of their land under notice, the noticee himselves will be responsible for any future dispute or complaint regarding the area and boundary of the said Land mentioned in this order.

3. Contiguity of the road is broken due to partial area of the said Land getting released from the said Road. Therefore, from transportation & connectivity point of view the said Road is required to be retained on the same area as proposed in the said Sanctioned Development Plan. In this regard, the Chief Officer. Municipal Council. Gondia as a Planning Authority should take appropriate action in the framework of law by offering any other alternative to the said Land owner with his consent.

4. A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the areas of the said Land which are lapsed from the said Reservation and Road is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Katol, District Nagpur during office hours on all working days for inspection to public upto one month.
5. This Order shall also be published on the Directorate's official website. *www.dtp.maharashtra.gov.in.*

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 7th October, 2024.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३४२.

संचालक, नगर रचना, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.

आदेश

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो.बल्लारपूर-कलम-१२७(२)-आदेश-टपीव्ही-२-६६६१.–

ज्याअर्थी, बल्लारपूर नगर परिषदेची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) चे तरतूदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-२२०२-१२६०-प्र.क्र.२(बी)-२००४-नवि-९, दिनांक १६ ऑगस्ट, २००५ अन्वये (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिले आहे.) भागशः मंजूर केली असून, ती दिनांक ०१ ऑक्टोबर, २००५ पासून अंमलात आलेली आहे. तसेच, वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२२०२-१२६०-प्र. क्र. २-२००४-नवि-९, दिनांक १८ जून, २००८ अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक २८ जूलै, २००८ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौजा बल्लारपूर येथील स. क्र. ३१/४०/अ या जमिनीपैकीचे क्षेत्र हे 'आरक्षण क्र. ४५, स्टेडियम' या आरक्षणाने बाधित होत असून (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणाच्या भूसंपादन व विकासासाठी नियोजन व समुचित प्राधिकरण नगर परिषद, बल्लारपूर आहे (यापुढे " उक्त समुचित प्राधिकरण " असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षांच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमीन संपादन केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौजा बल्लारपूर येथील स. क्र. ३१/४०/अ या जमिनीपैकी 'आरक्षण क्र.४५, स्टेडियम' या आरक्षणाने बाधित क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) संबंधित जमीन मालक यांनी (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिले आहे) उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतूदीनुसार उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक २८ ऑक्टोबर,२०२१ रोजी सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजाविली होती व ती समुचित प्राधिकरणास दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२१ रोजी प्राप्त झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनमालकांनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त नियोजन प्राधिकरणाने विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केली नाही अथवा, उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, चंद्रपूर शाखा, चंद्रपूर यांचेकडील पत्र क्र. १९२८, दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ अन्वये, विहित कालावधीत भूसंपादनाबाबतची कार्यवाही झालेली नसल्याने, सदरचे आरक्षण व्यपगत ठरते, अशी या कार्यालयाची धारणा आहे. सदर आरक्षणासाठी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये अधिसूचना प्रसिध्द करण्यास हरकत वाटत नाही. असे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडील पत्र क्र. १४६६, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ अन्वये अहवाल सादर करून अंतिमतः, 'मुख्याधिकारी, नगर परिषद, बल्लारपूर यांनी उक्त आरक्षणाच्या भूसंपादनाकरीताचा निधी मागणी प्रस्ताव शासनास का सादर केला नाही? याबाबत प्रथमतः मुख्याधिकारी, नगर परिषद, बल्लारपूर यांचेकडून खुलासा मागवून त्यानंतर पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.

सबब, मुख्याधिकारी, नगर परिषद, बल्लारपूर यांचा खुलासा प्राप्त करून घेऊन, मा. न्यायालयाचे आदेशानुसार उक्त जागेवरील उक्त आरक्षणाने बाधित क्षेत्राकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ (२) अन्वये अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक आहे. असे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, रिट याचिका क्र. १६४९/२०२४ मध्ये, मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी दिनांक १८ जून, २०२५ रोजी उक्त आरक्षण व्यपगत झाले असल्याचे आदेश पारित केले आहेत. सदर आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाने मौजा बल्लारपूर येथील स. क्र. ३१/४०/अ या जमिनीपैकी क्षेत्रावरील 'आरक्षण क्र.४५, स्टेडियम' हे आरक्षण व्यपगत झाल्याची अधिसूचना न्यायालयाच्या आदेशाच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत निर्गमित करणेबाबत प्रतिवादींना आदेशित केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनींवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम - १२७(२) चे तरतुदीनुसार उक्त जमिनीचे क्षेत्रावरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.टिपीएस-१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा/नगर पंचायती/जिल्हा परिषदा यांच्या विकास योजनेसंबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहेः-

परिशिष्ट

अ.क्र.	नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा	उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र	जमिनीचा तपशील	उक्त आरक्षणातून व्यपगत झाले अंदाजे क्षेत्र (चौ.मी.)
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	बल्लारपूर नगर परिषद, मौजा बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर	आ. क्र. ४५, “स्टेडीयम ” (अंदाजे क्षेत्र ५.५८ हे.)	सर्व्हे क्र. ३१/४०/अ	अंदाजे ११३२९ चौ. मी.

टीप :- १. उक्त जमीन मालकांनी उक्त सूचनेंतर्गत उक्त जमिनीचा मूळ मोजणी नकाशा सादर केला नसल्याने, आरक्षणा खालील क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्भवल्यास त्यास उक्त जमीन मालक जबाबदार राहतील.

२. सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी उक्त व/किंवा संबंधित जमीन मालकांनी सूचनेखालील उक्त जमिनीचा भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर करणे आवश्यक राहील.

३. उक्त आरक्षणातून मुक्त झालेली जमीन संबंधित जमीन मालकांना मंजूर विकास आराखड्यांतर्गत लागून असलेल्या जमिनीप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या विकासाच्या उद्देशासाठी उपलब्ध होईल.

४. उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, बल्लारपूर नगर परिषद, जि. चंद्रपूर यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

५. उक्त जमिनीबाबत भविष्यात मालकी हक्क अथवा सरकारी पट्टा बाबत कोणताही वाद अगर तक्रार उद्भवल्यास त्यास उक्त जमीन मालक जबाबदार राहतील.

६. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

जितेंद्र ल. भोपळे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ११ नोव्हेंबर, २०२५.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३४३.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

ORDER

No. D.T.P.D.P.-Ballarpur/Sec-127(2)/Order/TPV-II/6661

Whereas, the Development Plan of Ballarpur Municipal Council has been partly sanctioned as per the provisions of section 31 *(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS- 2202/1260/CR-2(B)/2004/UD-9, dated 16th Augest, 2005 (hereinafter referred to as "the said Notification") & has come into force with effect from dated 01th October, 2005, (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan") and Excluded Plan has been sanctioned by the Government in Urban Development Department vide Notification No. TPS-2202/1260/CR-2/2004/UD-9, dated18th June, 2008 & has come into force with effect from dated 28th July, 2008;

And whereas, as per the said Sanctioned Development Plan, the part area of land bearing S. No. 31/40/A at Mouja Ballarpur is affected by 'Reservation No. 45, Stadium' (hereinafter referred to as "the said Reservation") and the Planning and Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is the Municipal Council, Ballarpur (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land, affected by the said Reservation, has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan has come into force;

And whereas, the concerned land owners (hereinafter referred to as "the said Land Owners") of the Land bearing S. No. 31/40/A at Mouja Ballarpur had served a notice dated 28th October, 2021 in respect of the land affected by the said Reservation (hereinafter referred to as "the said Land") as per the provisions of section 127*(1)* of the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority and same has been recieved by the Appropriate Authority on 09th November, 2021;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps as required

as per the provisions of section 127 *(1)* of the said Act have been taken by the Planning Authority within the stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas, the Assistant Director of Town Planning, Chandrapur Branch, Chandrapur *vide* letter No. 1928, dated 26th August, 2025 has submitted report stating that, 'This office is of the opinion that since the land acquisition process has not been completed within the prescribed period, the said reservation lapses. There is no objection to the publication of the notification under Section 127 *(2)* of the said Act for the said reservation, as per the directions given by the Hon'ble High Court,';

And whereas, the Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur, vide letter No. 1466, dated 18th September, 2025, has submitted a report and finally stated that, 'Why did the Chief Officer, Municipal Council, Ballarpur not submit the proposal for the demand of funds for the acquisition of the land of the said reservation to the Government? It would be appropriate to first seek clarification from the Chief Officer, Municipal Council, Ballarpur in this regard and then take further action.

Therefore, after obtaining the clarification of the Chief Officer, Municipal Council, Ballarpur, it is necessary to issue a Notification under Section 127*(2)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 for the area affected by the said reservation on the said land, as per the order of the Hon'ble Court,;

And whereas, in Writ Petition No. 1649/2024, the Hon'ble Mumbai High Court, Nagpur Bench, Nagpur has passed an Order on 18th June, 2025 that, the said Reservation has lapsed. By virtue of the said Order, the Hon'ble High Court has directed the Respondents to issue a Notification of lapsing of the 'Reservation No. 45, Stadium' on the land at S. No. 31/40/A of Mauja Ballarpur within four months from the date of the order of the court;

And whereas, in view of the above stated facts regarding the said Reservation on the said land in the said Sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that it is necessary to issue an order regarding the lapsing of the said Reservation on the said land as per the provisions of section 127*(2)* of the said Act;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, vide Resolution No.TPS-1813/3211/CR- 508/UD-13, dated 01th December, 2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 *(2)* of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the said land as per the provisions of section 127*(2)* of the said Act and for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added :-

SCHEDULE

Sr. No.	Municipal Council, Mouza, Taluka and District	Proposal in the said Sanctioned Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report	Description of the Land	Approximate Area lapsed of the said Reservation
(1)	(2)	(3)	(4)	(5)
				(sq. mt.)
1	Municipal Council Ballarpur, Mouza Ballarpur, Tal. Ballarpur, Dist. Chandrapur.	Reservation No.45, “Stadium” (Approximate area- 5.58 Ha)	S. No. 31/40/A	Approximate Area 11329 sqm

Note:- 1. As the said land owners have not submitted the original demarcation map of the said lands under the notice, the said land owners will be responsible for any future dispute or complaint regarding the area under Reservation.

2. Before certifying the part plan in accordance with the said order, the said and/or land owners will be required to submit updated and certified demarcation map of the Land Records Department for the said land under the notice.

3. The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent Land under the said sanctioned Development Plan.

4. A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the area of the said Lands which is lapsed from the said Reservation is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Ballarpur, District Chandrapur during office hours on all working days for inspection to public upto one month.

5. The said landowner will be responsible for any dispute or complaint arising in the future regarding ownership or government lease of the said land.

6. This Order shall also be published on the Directorate's official website. *www.dtp.maharashtra.gov.in.*

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 11th November, 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.